विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय,
३ रा मजला, एच् विंग, राज्यकर भवन,
माझगांव, मुंबई-४०० ०१०.
दूरध्वनी क्र:-०२२-२३७६०८६५/३९०.

प्रति,
खुला महिला प्रवर्गातुन शिफारसपात्र उमेदवार
-------------------
-------------------

क्रमांक :- आस्था-५/विलिपि-१/कर सहायक/२०१६/ब :- ६२१ मुंबई, दिनांक :- २५/०८/२०१५

विषय:- खुला महिला प्रवर्गातील उमेदवारांच्या कर सहायक पदावरील नियुक्तीबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का-२ दि. २५.०५.२००१.

कर सहायक परीक्षा २०१४, २०१५, प्रतिक्षा यादी २०१४, २०१५, कर सहायक परीक्षा-२०१६ या परीक्षांव्दारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून **खुला महिला प्रवर्गातुन शिफारस** करण्यात आलेल्या मात्र **अद्यापपर्यंत नियुक्ती आदेश निर्गमीत न झालेल्या** सर्व महिला उमेदवारांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५.०५.२००१ मधील परिच्छेद (दोन) (अ) (८) येथे नमुद केल्यानुसार महिला व बालविकास आयुक्तालयाकडून प्रमाणपत्र पडताळणी अहवाल एका महिन्यात प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवारास सदर प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात यावी अशी तरतुद असुन सदर तरतुदीनुसार अद्यापपर्यंत नियुक्ती आदेश पारित न करण्यात आलेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश पारित करण्याविषयी मा. राज्यकर आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर पत्राव्दारे आपणांस कळविण्यात येते की, **अद्यापपर्यंत कर सहायक पदावर नियुक्ती आदेश पारित न करण्यात आलेल्या खुला महिला प्रवर्गातील उमेदवारांनी** सोबत जोडलेल्या नमुन्यातील मसुद्यानुसार १०० रु. च्या बाँडवर हमीपत्र तयार करुन त्वरीत या कार्यालयास सादर करावेत जेणेकरुन आपले नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येतील. हमीपत्र सादर न केल्यास आपले नियुक्ती आदेश पारित करण्यात येणार नाही व होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची गंभीरपणे नोंद घ्यावी.

**सहाय्यक राज्यकर आयुक्त, आस्था-५**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

सहायक विक्रीकर आयुक्त (आस्थापना-५), अपर विक्रीकर आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

C:\Users\MY1\Desktop\Desktop Folder\Open Female Posting.docx

१००/- रुपयांच्या बॉंडपेपरवर सदर मसुद्यानुसार हमीपत्र लिहून सादर करावे.

# हमीपत्र

मी ---------------------------------------- वय- ----- राहणार- -------------- शपथेवर लिहुन देते की, माझी कर सहायक परीक्षा वर्ष --------- व्दारे खुला महिला प्रवर्गातुन कर सहायक या पदावर निवड झालेली असुन माझे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र अद्यापपर्यंत महिला व बालविकास आयुक्तालयाकडून पडताळणी होऊन आलेले नसुन महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५.०५.२००१ मधील परिच्छेद (दोन) (अ) (८) येथे नमुद केल्यानुसार महिला व बालविकास आयुक्तालयाकडून प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अहवाल एका महिन्यात प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवारास सदर प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात यावी अशी तरतुद असुन सदर तरतुदीनुसार मी कर सहायक पदावरील नियुक्ती स्वीकारत असुन भविष्यात माझे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र महिला व बालविकास आयुक्तालयाकडून अवैध ठरविण्यात आल्यास माझी कर सहायक पदावरील नियुक्ती रद्द करण्यात येईल याची मला पुर्णपणे जाणीव असुन यासाठी माझी कुठल्याही प्रकारची हरकत असणार नाही.

वरील माहिती मी विचारपुर्वक, कुणाच्याही दबावाला बळी न पडता लिहुन देत असुन वरील माहिती ही खरी आहे. करिता हमीपत्र लिहुन देत आहे.

स्वाक्षरी

लिहुन देणार

नाव -----------------------------

कर सहायक परीक्षा वर्ष ------------

गुणवत्ता यादी क्रमांक -------------

C:\Users\MY1\Desktop\Desktop Folder\Open Female Posting.docx